

# राम विरुद्ध रावण

- दीपाली पाटवदकर

# पुत्र म्हणून



| राम | वि. | रावण |
|---|---|---|
| रामाने आपल्या मृदू स्वभावाने दशरथाचे मन जिंकले होते. राम दशरथाच्या काळजाचा तुकडा होता. | | विश्रवा ऋषी आपल्या मुलाच्या म्हणजे रावणाच्या वागण्याने हैराण झाले होते. |
| वडिलांच्या शब्दासाठी राम अयोध्या सोडून वनात गेला. | | रावणाने कुबेराशी केलेला दुष्ट व्यवहार पाहून, व्यथित अंत:करणाने विश्रवा लंका सोडून निघून गेले. |

# बंधू म्हणून



| राम | वि. | रावण |
| --- | --- | --- |
| रामाने लहान भावासाठी अयोध्येचा त्याग केला. | | रावणाने मोठ्या भावाचे, कुबेराचे राज्य बळकावले. |
| रामाने भावांवर जिवापाड प्रेम केले. त्यामुळे राम वनवासात गेला तर त्याचे तिन्ही भाऊ राजवाडा सोडून अरण्यात रामाकडे आले. | | रावणाला भावांविषयी जराही आत्मीयता नव्हती. त्यांच्याशी फटकारून वागत असे. परिणामी त्याचा एक भाऊ लंका सोडून रामाकडे गेला. |

# बंधू म्हणून



## राम

वि.

- युद्धात लक्ष्मण जखमी झाला, तेंव्हा रामाने लंकेतून वैद्याला पाचारण केले, दुरून संजीवनी बुटी आणवली आणि लक्ष्मणाला मृत्युच्या दाढेतून बाहेर काढले.

## रावण

- कुंभकर्णाला रावणाने सीतेला पळवून आणलेले आवडले नाही. पण रावणाच्या क्रोधामुळे तो युद्धाला तयार झाला. कुंभकर्णाला युद्धाला पाठवून, रावणाने त्याला मृत्युच्या खाईत लोटले.

# पती म्हणून



| राम | वि. | रावण |
|---|---|---|
| एकच पत्नी होती. | | अनेक स्त्रिया होत्या. |
| एकपत्नीव्रत. | | रावणाने किमान दोन स्त्रियांवर बलात्कार केला होता. 'पर दार अभिमर्शनम्' |
| शूर्पणखा लग्नाचा प्रस्ताव घेऊन आली, तरी रामाने तिला नाकारले. | | सीतेने त्याचा लग्नाचा प्रस्ताव नाकारला, तरी सुद्धा त्याने तिला पळवून नेले. |

# पिता म्हणून



| राम | वि. | रावण |
| --- | --- | --- |
| रामाने वृद्धापकाळी कोसल राज्य दोन मुलांमध्ये वाटून दिले. श्रावस्ती येथे लव व कुशावती येथे कुश याने नंतर राज्य केले. | | रावणाने आपली मुले – मेघनाद, अतिकाय, नरांतक, देवांतक, त्रिशिर आणि अक्षयकुमार या सर्वांना रामाशी युद्ध करायला पाठवले. स्वत:साठी आणखी एक राणी मिळवण्यासाठी हे युद्ध लढले जात होते. सहा मुलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. |

# काका म्हणून



| राम | वि. | रावण |
|---|---|---|
| ▫ भरताच्या मुलांना तक्षशीला (तक्षिला) चे राज्य.<br>▫ लक्ष्मणाच्या मुलांना लक्ष्मणपूर (लखनौ) चे राज्य.<br>▫ शत्रुघ्नाच्या मुलांना मधुपूर (मथुरा) चे राज्य. | | ▫ आपल्या पुतण्याचा लंकेच्या राज्यावरील जन्मसिद्ध हक्क त्याने बळकावला.<br>▫ कुबेराची पुत्रवधू, स्वत:च्या पुतण्याची बायको, रावणाने नासवली. |

# योद्धा म्हणून



| राम | वि. | रावण |
|---|---|---|
| ▫ अबलांचे रक्षण केले. उदा. विश्वामित्र व दंडकारण्यातील इतर ऋषी. | | ▫ अबलांच्या असहाय्यतेचा फायदा घेतला. उदा. कुबेर, वेदवती, पुंजीकस्थला. |
| ▫ खलांचा नाश केला. उदा. त्राटिका. | | ▫ खलांशी मैत्री केली. उदा. मारीच. |

# राजा म्हणून



| राम | वि. | रावण |
| --- | --- | --- |
| <ul><li>प्रजेसाठी स्वत:च्या पत्नीचा सुद्धा त्याग केला.</li><li>युद्ध केले परंतु अयोध्येला काडीचीही झळ पोहचू दिली नाही.</li></ul> | | <ul><li>दुसऱ्याची पत्नी मिळवण्यासाठी स्वत:च्या प्रजेचा त्याग केला.</li><li>स्वत:च्या हव्यासापायी - लंका जाळली गेली, युद्ध करावे लागले. युद्धात सैन्य, सेनापती, भाऊ, मुले, पुतणे आणि राज्य गेले.</li></ul> |

# भक्त म्हणून



| राम | वि. | रावण |
| --- | --- | --- |
| रामेश्वर येथे आपल्या आराध्य देवाचे शिवमंदिर उभे केले. | | शिवाच्या द्वारपालांनी एकदा रावणाला कैलासावर जाण्यास मज्जाव केला, तेंव्हा चिडून रावणाने कैलास उपटून आपल्या आराध्य देवाला बळजबरी लंकेला न्यायचे ठरवले. |